**४७) रविशंकर महाराज उवाच.**

रविशंकर महाराजांचा एक अनोखा विचार आज वाचला, 'वाटते तितके जग सुंदर नाही आणि वाटते तितके ते वाईटही नाही. स्वार्थी माणसेही सदैव वाईटच वागतात असे नाही. त्यांच्यात सज्जनतेचा अंश असतोच. ते झीज सोसून सत्कर्मेही करत असतात. स्वार्थीपणा ही विकृती आहे, प्रकृती नव्हे.'

या विचारास बळकटी देण्यासाठी रविशंकर महाराज म्हणतात, "एक सूचक उदाहरण देऊन मी या विचाराचे समर्थन करतो. कुणी लोखंडाचा रंग विचारल्यास, काळा हे उत्तर मिळते. ते खरे असूनही सर्वांगपूर्ण नाही. गंजलेला तवा लालसर दिसतो. तो घासून साफ केल्यास, चांदीसारखा चमकू लागतो. सुजाण मंडळी हे जाणून असतात. लोखंडाचे काळेपण हा निसर्ग आहे, गंज ही विकृती आहे आणि ती घासून साफ करण्याची क्रिया हा कर्मवाद वा प्रयत्नवाद आहे. प्रयत्नाने मूळ विकृतीच नव्हे तर प्रकृतीतही फेरफार करता येतो. घासलेला तवा चांदीसारखा लखलखीत दिसतोच; शिवाय गंजाचे विकृत पोपडे घासले जाऊन तो रेशमासारखा गुळगुळीत होतो. मला संस्कृत भाषा फारशी अवगत नाही, तरी यज्ञाचा पुरस्कार करणाऱ्या आपल्या पूर्वजांनी यज्ञाचे मर्म सांगताना, घासून उज्ज्वल होण्यास महत्व दिले आहे, हे मी जाणतो. प्रत्येक माणसाच्या स्वभावात स्वार्थीपणा आणि स्वार्थत्याग दोन्ही भावना असतात. कोणत्या वृत्तीस प्राधान्य द्यायचे, कोणती विकृती घासून पुसून साफ करायची ते आसपासची परिस्थिती आणि माणसाचे मानस नक्की करते. प्रत्येक व्यक्ती परिस्थितीचा घटक असते. प्रत्येक घटकाने विकृती पुसून प्रकृतीस रेशमासारखे मुलायम आणि चांदीसारखे झळझळीत रुप प्रदान करण्याचा निश्चय केला तर हे जग सुंदर होईल. नक्की सुंदर होईल, असा मला विश्वास वाटतो. चला, आपण सारे या क्षणापासून जगाच्या सौंदर्याचा विकास करण्याचा संकल्प सोडू."

**४८) बुद्धोपदेश.**

भगवान बुद्धांचा आशीर्वाद लाभला तर आपल्या पापांचा नाश होईल आणि आपल्याला मोक्ष मिळेल, असे समजणाऱ्या एका शेठजींकडे बुद्धदेव एकदा भिक्षा मागायला गेले. बुद्धदेव शेठजींची इच्छा जाणून होते. आपले आराध्य आपल्या दारी आल्याचे पाहून शेठजींना खूप आनंद झाला. खीर भरलेले कमंडलू घेऊन ते भिक्षा देण्यास सिद्ध झाले. बुद्धदेवांनी भिक्षापात्र पुढे केले. ते मातीचे पात्र अत्यंत अस्वच्छ होते. त्यात खीर ओतणे शेठजींना योग्य वाटले नाही. नोकरास बोलावून त्यांनी भिक्षापात्र घासून आणण्याचा आदेश दिला. स्वच्छ भिक्षापात्रात खीर वाढून ते म्हणाले, "भिक्षेला निघण्यापूर्वी पात्र स्वच्छ असल्याचे बघून घेत चला. अस्वच्छ पात्रामुळे भोजनाचे पावित्र्य आणि स्वाद नष्ट होतो."

"वत्सा, हे कमंडलू साफ केल्याबद्दल आभार. पण कमंडलू स्वच्छ असल्याची खात्री करून घेण्याचे काम, तुझ्यासाठीही आवश्यक आहे, हे समजून घे." बुद्धदेव शांत स्वरात उत्तरले. ,

"भगवान, कमंडलू स्वच्छ असल्याची खात्री केल्यावरच मी खीर ओतली." गोंधळलेल्या शेठजींनी सांगण्याचा प्रयत्न केला.

"मी खीरीच्या कमंडलूविषयी सांगत नाही. तन-मनरूपी कमंडलूच्या संदर्भात मला सांगायचे आहे. ते मलीन असले तर जीवन कलुषित होते. जे आतून अपवित्र असते त्यास बाहेरही मलीनत्वाचे दर्शन घडते." शेठजींना बुद्धदेवांच्या म्हणण्याचे रहस्य उमगले आणि ते खजिल झाले. त्यांनी स्वतःस भगवान बुद्धांच्या चरणी झोकून देऊन उपदेश मागितला.

"या उपदेशास अंमलात आणले तर वरवरच्या वेगळ्या उपदेशाची गरज भासणार नाही. जीवन आपसूक पावन बनेल." इतके बोलून भगवान बुद्ध चालू लागले.

**४९) भार आभूषणांचा!**

भक्तश्रेष्ठ नाभाजींकडे लोक आदराने बघत. त्रेतायुगातील ऋषी, नाभाजींच्या रूपात पृथ्वीवर अवतरले आहेत, असे सर्वांना वाटे. त्यांचा निर्मोही स्वभाव, प्रजेत कौतुकाचा विषय होता. त्यांचे प्रवचन ऐकण्यास, खूप दूरचे लोक धडपडत येत. एकदा नाभाजींना कुणीसे सांगितले की विशिष्ठ दिवशी जयपुरच्या महाराणी प्रवचन ऐकायला येणार आहेत.

"हा आश्रम म्हणजे हरिदरबार आहे!" नाभाजी शांतपणे उद्गारले, "इथे राव आणि रंक यांचे सारख्या प्रेमाने स्वागत होते. श्रवणाचा अधिकार प्रत्येकास आहे."

नाभाजींची वृत्ती निर्लेप असली तरी सारे आश्रमवासी ती आत्मसात करू शकले होते, असे नव्हे. त्यांनी महाराणींच्या स्वागतासाठी आश्रमाची विशेष साफसफाई आरंभली. स्वच्छतेचे महत्व योग्य ठरवून नाभाजींनी आक्षेप घेतला नाही. म्हणून महाराणींचे स्वागत नीट व्हावे, असे त्यांनाही वाटते, असे शिष्यांना वाटले.

ठरल्यावेळी लवाजम्यासह महाराणींचा वैभवपूर्ण रथ आश्रमात पोहोचला. शिष्यांनी आदराने त्यांना आसनस्थ होण्याची विनंती केली. आश्रमात केवळ दर्भाचीच आसने होती. प्रवचनाची वेळ होत आली होती. महाराणींना 'या बसा' म्हणण्याचा

उपचार पाळून नाभाजींनी प्रवचन सुरू केले. त्यांच्या वाक्गंगेत महाराणींना सचैल स्नान केल्याचा आनंद लाभला. प्रवचन संपताच प्रसाद वाटण्यात आला. लगेच महाराणींचे चाकर पुढे आले. त्यांनी नाभाजींच्या पायाशी मखमलीचे सुंदर वस्त्र अंथरले. देहावरील काही आभूषणे उतरवून महाराणींनी स्वहस्ते त्या वस्त्रावर ठेवली. जयपुरच्या उत्तम कलाकारांनी अमूल्य हिरे-मोती जडवलेली ती कनकाभूषणे पाहून श्रोतृवर्ग चकित झाला.

"भक्तश्रेष्ठ," महाराणी नम्र स्वरात म्हणाल्या, "जीवनाच्या बोजाचा काही अंश उतरवून आपल्या चरणी धरण्याचा हा अल्प प्रयत्न आहे. त्याचा स्वीकार करावा."

"महाराणी, मी गरीब, निष्कांचन, अपरिग्रही साधू! मला या अलंकारांचा उपयोग नाही." नाभाजी निरीच्छ स्वरात म्हणाले.

"त्याचा विनियोग कसा करावा, हे सांगण्याची क्षमता माझ्यात नाही." महाराणी नम्र स्वरात उत्तरल्या, "हा आपल्या कथनाचा परिणाम आहे. आपण त्यागाचा महिमा सांगितलात. तो उपदेश ह्रदयात उतरल्याची ही प्रचिती आहे. आजवर मी गुंजभर सोन्याचाही मोह आवरू शकले नव्हते. आपले बोल ऐकून हे आक्रित घडले. तपस्येच्या संदर्भात कांचन अहितकर वस्तू असली तरी आश्रमातील दैनंदिन व्यवहार सुकर होण्यात ती मदतरूप ठरू शकेल. म्हणून आपण त्याचा स्वीकार करावा."

महाराणींशी वाद न घालता, स्वलिखित ग्रंथ 'भक्तमाळा' त्यांच्या समोर धरत नाभाजी म्हणाले, "आश्रमात हाच प्रसाद आहे."

"भक्तराज," महाराणी भावविभोर स्वरात म्हणाल्या, "मी पामर असूनही अकल्प्य आणि अमूल्य ज्ञान, ठासून भरलेला ग्रंथ आपल्या हस्ते प्राप्त करण्याचे भाग्य मला लाभले. या आनंदास तोड नाही. विश्वातील सर्व संपत्ती एका पारड्यात आणि दुसऱ्यात या ग्रंथातील ज्ञान ठेवले तर ग्रंथाचे पारडेच जड ठरेल."

प्रसादास नेत्रस्पर्श करवून महाराणींनी निरोप घेतला. नाभाजींना महाराणींची नम्रता भावली, म्हणून त्यांनी महाराणींच्या देणगीचा अव्हेर केला नाही, असे शिष्यांना वाटले. लगेच त्यांनी देणगीचा विनियोग कसा करायचा, ते ठरवायला चर्चा सुरू केली.

"हिऱ्याच्या बांगड्यातूनच पक्क्या बांधणीचे मंदिर उभारता येईल. फार वर्षे गवताच्या झोपडीत राहिलेल्या देवांचे नशीब उघडले म्हणायचे."

"मंदिरच का? प्रत्येक हिरा इतका मौल्यवान आहे की मंदिराच्या आसपास पाकशाला आणि भक्तांच्या निवासासाठी खोल्याही बांधता येतील, यातून!" दुसरा शिष्य उत्साहाने फसफसला.

"मंदिराचे शिखर अगदी वैभवपूर्ण आणि झोकदार करायचे बरे का!" एका चतुर शिष्याने विचार मांडला, "मंदिराची पायाभरणी महाराणींच्या हस्ते केली तर त्या पुन्हा देणगी देतील आणि त्यातून दैनंदिन भोजन

आणि प्रसादाची कायम स्वरूपात सोय होऊ शकेल."

नाभाजी शांतपणे जप करत होते. ही चर्चा त्यांना ऐकू येत होती की नाही, हे कळायला मार्ग नव्हता. बराच वेळ चर्वितचर्वण करून सारे थकले आणि गप्प झाले; तरी नाभाजींचा जप थोडा वेळ चालू राहिला. जप संपवून त्यांनी एका प्रामाणिक झवेऱ्यास बोलावणे धाडले. तोवर महाराणींनी दिलेल्या भेटींची बातमी गावात पसरली होती. म्हणून नाभाजींचे बोलावणे येताच, झवेरी पैशासह हजर झाला. त्या दागिन्यांचे मूल्यांकन करून त्याने मोठी रकम जाहिर केली. विसारापोटी आणलेले पैसे देऊन उरलेली रकम आणायला तो घरी गेला.

नाभाजींनी षड्रसयुक्त भोजन तयार करण्याचा आदेश दिला. त्या आदेशाने शिष्यांचा उत्साह द्विगुणित केला. पण नाभाजींनी आसपासच्या गोरगरीबांना जेवायला बोलावले. गोरगरिबांच्या पंगती बसल्या. कधी बघितले नव्हते असे सुग्रास भोजन गरीबांना खायला मिळाले. तोवर झवेरी उरलेली रकम घेऊन परतला. नाभाजींनी निरीच्छ मनाने ते सारे धन दक्षिणेच्या रूपात गोर-गरीबांना वाटून दिले. शिष्यवर्ग अवाक होऊन बघत राहिला.

"ज्या अलंकारांचा भार आभुषणांचा सोस असणारी एक स्त्री सहन करू शकली नाही त्या अलंकारांचा बोजा संताने कसा मिरवावा?" नाभाजींनी शांत स्वरात प्रश्न विचारला, "कुणाच्या देहावरून उतरलेला बोजा स्वदेहावर लादतो त्यास शहाणा कसे म्हणावे?" कृतीद्वारे अमोल विचार शिष्यवर्गास शिकवून नाभाजी उठले.

लोककल्याणासच जीवनधर्माचे स्थान देणाऱ्यासमक्ष जितकी अधिक संपत्ती ठेवावी तितका तो अधिक विरक्त होतो, याची जाणीव झालेला शिष्यवर्ग, नाभाजींचा प्रश्न ऐकून भारावला.

**५०) निर्भय लोहपुरुष.**

इंग्रजांच्या राजवटीत सातव्या कोर्टात कज्जे चालवणाऱ्या एका न्यायाधीशाची ही कथा! दुपारचे बारा-साडे बारा वाजले की त्याला झोप अनावर होई. तो डुलक्या घेऊ लागला की त्याचे काम शिरस्तेदार हाती घेई. म्हणून जे दावे प्रस्थापित वकील लढवत असतील, ते दावे सकाळी आणि तरुण नवे वकील चालवत ते दावे दुपारी बारानंतर लावण्याचा प्रघात पडला होता. तरुणांना हे अयोग्य वाटत असूनही ते होतकरु वकील, न्यायाधीशाच्या विरोधात ब्र उच्चारु शकत नव्हते.

अशाच एका दाव्यासाठी दुपारी साडे बाराची वेळ देण्यात आली. तसा तो सुरू झालाही! तो सुरू होण्या पूर्वीच, न्यायाधीश डुलक्या घेत झुलू लागले होते. तरुण वकीलाने काम सुरू करून जेमतेम पाच मिनिटे झाली आणि ते गाढ झोपी गेले. सवयीनुसार पुढचे काम करण्यासाठी शिरस्तेदार पुढे झाला. नवोदित वकीलाने मात्र दाव्याच्या संदर्भात टेबलवर मांडलेली कागदपत्रे गोळा केली आणि स्वतःच्या ब्रीफकेसमध्ये भरली. ही जाण्याची तयारी स्पष्ट कळणारी होती. तसा तो निघालाही! म्हणून शिरस्तेदार भडकला. आपण न्यायाधीश नसून शिरस्तेदार आहोत, याचे त्याला विस्मरण झाले होते. त्याने शिपायाकरवी या वकीलास बोलावणे धाडले. पण त्या तरुणाने उलट निरोप धाडला, "शिरस्तेदाराच्या सांगण्यावर मी येणे शक्य नाही. न्यायाधीशाचे बोलावणे असेल तरच मी परतेन."

शिपायाने शब्दशः हा निरोप पोहोचवला. शिरस्तेदारास चीड आली तरी न्यायाधीशास हलवून जागे करण्यास गत्यंतर नसल्याचेही जाणवले. न्यायाधीशाने वकीलास बोलावणे धाडताच तो परतला. त्याच्याकडे वेधक नजरेने बघत न्यायाधीशाने विचारले, "महाशय, केसचे काम अर्धवट सोडून तुम्ही बाहेर का गेलात?" त्या तरुणाने थंड नजरेने न्यायाधीशाच्या तारवटलेल्या डोळ्यांकडे बघितले.

"युअर ऑनर," तो कणखर स्वरात उत्तरला, "मी अशीलाची बाजू न्यायाधीशासमक्ष मांडण्याची फी घेतो - शिरस्तेदारासमक्ष केस रुजू करण्यासाठी नव्हे."

या तरुण वकीलाच्या पराक्रमाची देशभर चर्चा झाली. न्यायाधीशास डुलक्या घेण्याच्या सवयीस तिलांजली द्यावी लागली. हा तरुण धाडसी वकील पुढे भारताचा लोहपुरुष म्हणून प्रसिद्धी पावला. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्याचा सिंहाचा वाटा होताच; शिवाय संस्थानिकांची राज्ये खालसा करण्यात त्याने

फार महत्वाची कामगिरी बजावली. भारताच्या पंतप्रधानाची जागा त्यास देण्यात आली असती तर देशाच्या परिस्थितीत चांगल्या अर्थाने फरक पडला असता; असे सुजाणांचे मत आहे. अर्थात ते ज्या पदावर होते त्या पदावर राहूनही त्यांनी देशाचे हित जपलेच असते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते लवकरच कालवश होणे हे देशाचे दुर्दैव, असेही साऱ्यांना वाटते. होय, हा तरुण म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल!

**५१) वारस टीपू सुलतानाचा!**

इंग्रजांचा विरोध करणारा सिंह म्हणून टिपू सुलतानचे नाव विख्यात आहे. त्याचे वारसदारही त्याचे नाव लावण्यास लायक असे दिलदार होते, हे मात्र फारसे कुणास ठाऊक नाही. टीपूच्या वंशातील प्रिन्स बसरुद्दीनचे दर्यादिल वर्तन विषद करणारी ही कथा!

बसरुद्दीनच्या समंजसपणाची दूरवर बोलबाला! दूर सुदूरचे लोक, जटिल समस्येच्या निराकरणासाठी आदराने त्याच्याकडे येत. एकदा शेजारच्या नगरातील सहाजण त्याच्या भेटीस आले. त्यातील पाच जणांशी प्रिन्सचा परिचय होता. शेजारच्या नगरातील अग्रगण्य नागरिक म्हणून ते विख्यात होते. एका महत्वाच्या कार्यासाठी ते प्रिन्सला निमंत्रित करायला आले होते. प्रिन्सने त्या निमंत्रणाचा स्वीकार केला. त्यांना निरोप देण्यासाठी प्रिन्स उठले आणि अचानक महत्वाचे काम उपटले. प्रिन्सला आत जावे लागले.

सहावा अपरिचित माणूस प्रिन्सच्या व्यक्तिमत्वानेच नव्हे तर श्रीमंतीनेही प्रभावित झाला होता. प्रिन्सच्या मेजावरचे सोन्यात मढवलेले घड्याळ त्याला इतके आवडले की त्याची दानत बिघडू लागली. नेमके तेव्हाच प्रिन्सला कामासाठी आतल्या दालनात जावे लागले. आवडलेले घड्याळ ढापता यावे असा क्षण, त्या अगांतुकास खुणावू लागला. पटकन घड्याळ उचलून त्याने शालीखाली दडवले. काम संपवून प्रिन्स बाहेर आले तेव्हा अगांतुकाने सहजपणाचा आव आणला. प्रिन्सने पाहुण्यांना प्रेमाने निरोप दिला. सारे निघाले. नेमका त्याच वेळी घड्याळात गजर वाजू लागला आणि तो इसम बावरला. त्याला घाम फुटला. घाईने त्याने घड्याळ जागी ठेवण्याचा प्रयत्न केला. तो तसे करत असताना त्याची प्रिन्सच्या मुलाशी नजरानजर झाली. मुलाच्या नजरेत चोरास सजा फटकारण्याची इच्छा उचंबळली. पण मोठ्यांचा आदर करणाऱ्या त्या मुलाने योग्य कारवाईसाठी पित्याकडे बघितले. प्रिन्सने इशारा करून त्यास शांत राहण्यास सांगितले. तो माणूस घड्याळ जागीच ठेवून निघून गेला.

"अब्बाजान," सारे निघून गेल्यावर पुत्राने नाराजी व्यक्त केली, "चोरी सिद्ध झाली असून चोरास न पकडण्यात - अपराध्याला शासन न करता सोडून देण्यात काय हंशील आहे?"

"बेटा, अल्लातालाने त्याला योग्य शिक्षा केलेली असताना आपण त्या सजेत भर घातली असती तर अल्लातालाच्या दरबारात आपण गुन्हेगार ठरलो असतो."

"अल्लातालाने त्याला शिक्षा केली? केव्हा आणि कशी?" गोंधळलेल्या पुत्राने विचारले.

" तो निर्ढावलेला चोर नव्हता बेटा. घड्याळाने नेमक्यावेळी त्याचा घात करणे, हे अल्लातालाने त्याचा क्षणिक मोह उघडकीस आणणेच तर होते. धरणी दुभंगून पोटात घेईल तर बरे, असे वाटण्याजोगी परिस्थिती अल्लाने निर्माण केली. सभ्य माणसासाठी बेअब्रूहून मोठी शिक्षा असत नाही. आता तो जन्मात कधी चोरी करण्याचा विचार करणार नाही. पण आपण त्याला सजा फटकारली असती तर साध्या चोरातून निर्ढावलेला चोर निर्माण करण्याचे लांछन आपल्या माथी लागले असते.
क्षमाशील वर्तन हे अल्लाच्या दिशेने उचललेले पाऊल असते."

पित्याचा विचार पुत्रास पटला आणि क्षमाशील वर्तनाची कास धरणे त्यालाही पटले.

**५२) प्रताप आत्मबळाचा!**

आज काकांनी एक छान सत्यकथा सांगितली.

प्रेमळ मातापित्याची फुलासारखी कोवळी पोर बिछान्यास खिळली. तिची अवस्था पाहून आईच्या डोळ्यास अश्रुंची धार लागली. आईचा धीर सुटला; पण पित्याने मन घट्ट केले. लेकीच्या शुश्रुषेत जराही कसर न सोडण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यांचा कणखरपणा आणि प्रयत्नांची कास धरण्याचा निश्चय पाहून

खचलेल्या आईनेही मनाची उभारी परत प्राप्त केली. लेकीला लकव्याने आडवे केले होते. तीन वर्षे बाप पाण्यासारखा पैसा खर्च करत होता. त्यासाठी कष्टतही होता! आई प्रेमाची पाखर घालत होती. वैद्यकीय उपचारास जन्मदात्यांच्या शुश्रुषेचा सहयोग लाभला आणि लेक मृत्युवर मात करू लागली. पण या आजाराने तिच्या पायातील शक्ती हिरावून घेतली. उडत्या फुलपाखरागत धावपळ करणारी पोर, लुळा पाय ओढत सरकू लागली. लेकीला हौशीने कपडे दागिने आणून सजवायची, त्या वयात प्रेमळ जन्मदात्यांवर तिच्यासाठी कुबड्या खरीदण्याचा प्रसंग पडला. 'जान बची लाखो पाये', असे म्हणत आईबाप स्वतःची आणि लेकीची समजूत घालत. जीवनसंघर्षात तिला शक्य ती मदत करत. पण...

उथळ समाजात समंजसपणा कुठला असायला? 'लंगडी' हीच तिची ओळख ठरली. हाक मारताना, संबोधन म्हणून नाव नव्हे तर व्यंगाचा उपयोग केल्यास, तिचे मन घायाळ होईल, याचे प्रौढांना भान नसेल तर मुलांना कसे असणार? लेकीचे घायाळ होणे पित्याला रुचत नव्हते. अपंग पोरीच्या मनात खेळण्याची अनावर इच्छा आणि खेळायला कुणी नाही, हे जाणवले तरी उपाय सापडत नव्हता. त्यात एक जीवघेणा संवाद कानी पडला, "लंगडी खेळताना, मुलं तुला खेळायला घेतील हो!" कुणाचीशी आई फिदी फिदी हसत म्हणाली आणि मुलीच्या गळ्यातून हुंदका निसटला. लेकीची स्थिती पाहून प्रेमळ पिता हेलावला. त्याने लेकीस धीर दिला आणि तिने पित्याला पिता नव्हे तर सवंगडी समजावे, असे सांगितले. लेकीच्या मनाची उभारी टिकवून धरण्यातच नव्हे तर प्रगतीपथावर घोडदौड करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. त्यांचा निर्धार पाहून आईलाही हुरूप आला. ते दोघे लेकीचे सवंगडी बनले.

लेकीच्या जन्मदात्यांनी तिच्या उर्ध्वीकरणाचा ध्यास घेतला. अपंग माणसे मनाने पंगु नसतात. याचे खुद्द अपंगांनी भान ठेवावे. उलट कठोर समाजाशी शर्थीने लढत द्यायची सवय त्यांचे मन सामान्य वा सशक्त माणसांहून अधिक कणखर करते - नव्हे करायला हवे, हा पित्याने दिलेला कानमंत्र लेकीने नेकीने ग्रहण केला. दोन पायांवर धावणाऱ्या जनसामान्यांवर मात करण्याचा तिने विडा उचलला. यशाच्या प्राप्तीसाठी त्या बापलेकीने अथक प्रयत्नांचा मार्ग पसंत केला. पाहता पाहता तिने कुबड्यांपासून मुक्ती मिळवली. अभ्यास आणि सराव, तिच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनले. सुरवंट फुलपाखरू बनते, त्या सहजतेने अपंग पोरीतून लंगडी किशोरी नि मनःशक्तीच्या बळावर गोंडस तरुणी निर्माण झाली. जन्मदात्यांच्या प्रयत्नांचे तिने सोने केले. फक्त कुबड्यांविना चालणे शिकून ती थांबली नाही. धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊन तिने तिला लंगडी म्हणणाऱ्यांना मागे टाकून पारितोषिक पटकावले. आणि....

१९६० सालच्या ऑलेंपिकमध्ये भाग घेऊन तिने एक नव्हे तर तीन सुवर्णचंद्रक मिळवले. टेनसी राज्यातील या पराक्रमी अपंग कन्येचे नाव आहे विल्मा गोल्डीन रुडॉल्फ!

गीतेत परमेश्वराची कृपा प्राप्त झाली तर 'पंगुं लंघयते गिरी' ही संकल्पना आहे. प्रयत्नांची कास धरणाऱ्यास परमेश्वराची कृपा प्राप्त होते, हे सांगणारी समर्थ रामदास आणि तुकारामांची अवतरणेही प्रसिद्ध आहेत, 'केल्याने होत आहे रे...' आणि 'निश्चयाचे ऐसे बळ तुका म्हणे तेची फळ!' या अवतरणात काकांनी किपलिंगच्या एका कवितेची भर घातली. ज्यात कवी म्हणतो.... माझी सारी गात्रे गलित झाली तरी हरकत नाही, पण माझ्या मनोबळास आच येऊ देऊ नकोस.